वर्ष- १२ | अंक- ३४ | मुंबई, मंगळवार,०७ जुलै २०२६ ते १३ जुलै २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

PG|2

किशमिश आणि मनुका मध्ये काय फरक आहे, आरोग्यासाठी जास्त फायदेशीर काय ?

3 → सौरभ, राजा, केतन... अजून किती?

११ वर्षीय मुलीचे अपहरण... लैंगिक अत्याचारानंतर हत्या, कॅब चालक जेरबंद! ← 4

डॉक्टर्स दिनानिमित्त ३२४ शिक्षक-कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

आश्रय ट्रस्ट व के. के. वाघ महाविद्यालयाचा आरोग्य-जागर उपक्रम; नेत्रतपासणीसह विविध चाचण्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद







आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टच्या कार्यप्रवासामागे मुख्य विश्वस्त तथा संस्थापक स्वर्गीय डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांची दूरदृष्टी, समाजकारणाविषयीची तळमळ आणि सेवाभावी विचारसरणी हीच प्रमुख प्रेरक शक्ती राहिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून ट्रस्टने आरोग्य, शिक्षण, रक्तदान, थॅलेसेमिया जनजागृती, पर्यावरण संवर्धन आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांची मजबूत परंपरा उभी केली. समाजहिताला केंद्रस्थानी ठेवून कार्य करण्याची भूमिका, उपक्रमांतील सातत्य आणि सामाजिक बांधिलकीची जपणूक ही ट्रस्टची वैशिष्ट्ये आजही स्व. डॉ. नाईक यांनी घालून दिलेल्या मूल्यांवरच आधारलेली आहेत. त्यांच्या विचारांचा आणि समाजसेवेच्या वारशाचा पुढेही प्रभावीपणे धागा कायम ठेवत ट्रस्टकडून विविध लोकहितवादी उपक्रम राबविले जात आहेत. राष्ट्रीय डॉक्टर्स दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले हे आरोग्य शिबिरदेखील स्व. डॉ. नाईक यांच्या प्रेरणेतून आणि समाजाभिमुख दृष्टिकोनातून साकार झालेल्या उपक्रमांपैकी एक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.















नाशिक, प्रतिनिधी :

राष्ट्रीय डॉक्टर्स दिनाचे औचित्य साधत आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्ट, ठाणे आणि के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजामध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. विविध शैक्षणिक संस्थांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वेट स्वीपर, माळी, वॉचमन तसेच कॅन्टीन कर्मचारी अशा एकूण ३२४ जणांनी या शिबिराचा लाभ घेतला. बुधवार, दि. १ जुलै रोजी झालेल्या या आरोग्य शिबिरात अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल आणि ए. के. डायग्नोस्टिक्स लॅबोरेटरी, नाशिक यांचे सहकार्य लाभले. शिबिरात नेत्र तपासणी, रक्तदाब, रँडम शुगर, ईसीजी, पीएफटी (फुप्फुस कार्य चाचणी), सीबीसी अशा विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय फामार्नेक्सच्या माध्यमातून शरीरातील ऑंटिऑक्सिडंट पातळी जाणून घेण्यासाठी विशेष फिंगर स्कॅनिंग चाचणीही घेण्यात आली. आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टतर्फे आरोग्य, शिक्षण, सामाजिक जनजागृती, रक्तदान, थॅलेसेमिया निर्मूलन, पर्यावरण संवर्धन अशा विविध क्षेत्रांत सातत्याने उपक्रम राबविले जात असून, समाजहिताचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. राष्ट्रीय डॉक्टर्स दिनानिमित्त आयोजित हे शिबिर म्हणजे समाजाप्रती असलेल्या सामाजिक बांधिलकीचे प्रभावी उदाहरण असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या शिबिरावेळी ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव प्रा. प्रकाश पांगम तसेच ए. के. डायग्नोस्टिक्स लॅबोरेटरीचे रवींद्र कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्राजक्ता जठार, डॉ. हर्षदा तळेगावकर आणि डॉ. संजना अहिरे यांनी नेत्र तपासणी करून आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. तर फामार्नेक्सच्या मानसी नांदुरकर यांनी फिंगर स्कॅनिंग चाचणीद्वारे शरीरातील ऑंटिऑक्सिडंट स्तराबाबत माहिती दिली. कार्यक्रमासाठी के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष मा. समीरदादा वाघ, सरस्वती नगर संकुलाचे समन्वयक व विश्वस्त डॉ. व्ही. एम. सेवलिकर, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्या डॉ. अनुराधा नांदुरकर आणि विज्ञान विभाग प्रमुख प्रा. अर्चना कोते यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच स्माईल अँड स्पिनॅच संस्थेचे सचिव तथा के. के. वाघ एज्युकेशन सोसायटीचे जनसंपर्क संचालक मा. अजिंक्यदादा वाघ यांनी विशेष उपस्थिती दर्शवत या आरोग्य उपक्रमाचे कौतुक केले. शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी अशा शिबिरांची सातत्याने आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. ँशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विज्ञान विभागातील प्राध्यापक, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले. आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, आजारांचे वेळेत निदान होणे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

बोगस बियाणे-खत विक्रेत्यांवर मकोका?

पावसाळी अधिवेशनात विधानसभेत घडलं काय? बळीराजाची फसवणूक थांबणार?

मुंबई। राज्यात सर्वदूर मान्सून सक्रिय झाला आहे. मान्सूनने राज्य व्यापले आहे. दमदार पावसाने शेती मशागतीला आणि पेरणीला वेग आला आहे. दोन दिवसांच्या पावसामुळे शेतकऱ्यांनी बि-बियाणे, खते आणि इतर साहित्य खरेदीसाठी दुकानांकडे मोर्चा वळवला आहे. पण त्याचवेळी बोगस बि-बियाणे, खतांच्या विक्रीचाही धोका आहे. सरकारने अनेकदा कारवाई करून, सक्त नियम करूनही बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होते. तर काही ठिकाणी बि-बियाणे विक्रेत्यांवर कृषी विभागाकडून डोळे झाक होत असल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होते. त्यातच बोगस बियाणे-खत विक्रेत्यांवर 'मकोका' लावा अशी मागणी उद्धव ठाकरे गटाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी विधानसभेत केली आहे. या टोळ्यांवर मकोकाच लावा या पावसाळी अधिवेशनात उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी शेतकरी प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले.बोगस बियाणे आणि खतांची निर्मिती व विक्री करणाऱ्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगत, अशा टोळ्यांवर 'मकोका'सारखा कठोर कायदा लागू करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी विधानसभेत केली. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना कोणतीही दया न दाखवता कठोर शिक्षा व्हावी, तसेच बोगस बियाणे व खतांचा काळाबाजार कायमचा बंद करण्यासाठी प्रभावी कायदेशीर उपाययोजना कराव्यात, अशीही त्यांनी सरकारकडे मागणी केली आहे. आता सरकार त्यांच्या या मागणीवर यासंबंधी कठोर निर्णय घेते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एचटीबीटी बियाण्यांवर कृषी विभागाचे लक्ष या खरीप हंगामात बळीराजाची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभाग सक्रिय झाला आहे. बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार आणि अनधिकृत एचटीबीटी-तणनाशक सहनशील बियाणांविरुद्ध कृषी विभागाने कंबर कसली आहे. नियम मोडणाऱ्या विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार आहे. एचटीबीटी कापूस बियाणांच्या छुप्या विक्रीवर प्रशासनाची करडी नजर आहे. केंद्र सरकारच्या जीईएससी समितीची मान्यता नसलेली बियाणे ही जमिनीची सुपिकता नष्ट करतात आणि पर्यावरणाला घातक असल्याचे मानले जाते. आशा बियाणांचा साठा आढळल्यास संबंधितांविरोधात आता पर्यावरण संरक्षण कायदा 1986 अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे. फुटीर खासदारांना जोरदार टोला उद्धव ठाकरे हे २८ जून रोजी धाराशिव दौऱ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर ठाकरे शिवसेनेचे उमरगा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. त्यांनी पोस्ट केलेले बॅनर सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. बॅनरवरील ''फुटीने बदलतात ते आकडे... शिवसैनिकांची निष्ठा नाही!'' असे त्यांचे बॅनर एकदम चर्चेत आले आहे. या बॅनरमधून त्यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांना अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले आहे ''फुटल्याने शिवसैनिकांची निष्ठा बदलणार नाही,'' असा स्पष्ट संदेश देत ठाकरे गटाने आपल्या कार्यकर्त्यांना एकजूट राहण्याचे आवाहन केले आहे. या पोस्टमधून दिसून येत आहे. दरम्यान, २८ जून रोजी उद्धव ठाकरे यांच्या धाराशिव दौऱ्यापूर्वी हे बॅनर व्हायरल झाल्याने जिल्ह्यात ठाकरे शिवसैनिक चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसत आहे.



मान्सून सक्रिय झाल्यापासून राज्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस पडला आहे. शेतकऱ्यांना आता खरीप पिकाच्या पेरणी करायची आहे.त्यासाठी बि-बियाणे खरेदीसाठी गर्दी होत आहे. त्याचवेळी बोगस बि-बियाणे विक्रेत्यांवर मोठी कारवाईची मागणी रेटण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगरात मिशन हातोडा

एका दिवसात ४९ कॅफे झाले उध्वस्त, नेमकं कारण जाणून घ्या


छत्रपती संभाजी नगरात 3 दिवसापूर्वी एक कॅफे मध्ये मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली, यामुळं खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने आता ऑपरेशन हॅमर सुरू केले आहे.. यात ज्या ज्या कॅफे मध्ये तरुणाईला प्रायव्हसी च्या नावावर बसायला आडोसा मिळतो तिथं थेट हातोडा पडायला सुरुवात झाली आहे.



छत्रपती संभाजीनगर। छत्रपती संभाजी नगरात 3 दिवसापूर्वी एक कॅफे मध्ये मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली, यामुळं खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने आता ऑपरेशन हॅमर सुरू केले आहे.. यात ज्या ज्या कॅफे मध्ये तरुणाईला प्रायव्हसी च्या नावावर बसायला आडोसा मिळतो तिथं थेट हातोडा पडायला सुरुवात झाली आहे मंगळवारी एक दिवसात प्रशासनाने 49 कॅफे उध्वस्त केले आहेत..छत्रपती संभाजी नगरात सध्या कॅफेवर अशा पद्धतीने हातोडा पडतोय, ज्या ज्या कॅफे मध्ये तरुणाईला बसायला आडोसा , प्रायव्हसी जागा केल्या आहेत त्या जागा आता महापालिका आणि पोलिसणी संयुक्तपणे उध्वस्त करायला सुरुवात केली आहे, 3 दिवसापूर्वी एक अल्पवयीन तरुणीवर कॅफे मध्ये अत्याचार झाल्या ची घटना घडली आणि प्रशासनाने या सर्व कॅफे उध्वस्त करण्याची मोहीम सुरू केली, मंगळवारी संध्याकाळी शहरातील सिडको, वेदांत नगर, हर्सूल सह अनेक भागातील तब्बल 49 कॅफेवर एकाच वेळी कारवाई सुरू झाली. यात लपून बसायचा सर्व जागा महापालिकेने अक्षरशः फोडून काढल्यात, या कारवाईत कॅफेत अनेक धक्कादायक गोष्टी पुढं आल्या बसायला फारच एकांत अशी जागा, टेबल टेबल प्रमाणे लावलेले पडदे इतकंच नाही तर काही ठिकाणी दारूच्या बाटल्या आणि कॉंट्रॅसेपटिव्ह गोळ्या सुद्धा आढळून आल्याची माहिती प्रशासनाने दिलीय कॅफे यासाठी नाही असे सांगत महापालिकेने ही धडक कारवाई सुरू केली... मुलीवर कॅफेमध्ये अत्याचार झाल्यानंतर प्रशासन लागले कामाला पोलिसांनी गेली 2 दिवस असल्या सगळ्या कॅफेची रेकी केली त्याची एक यादी बनवली आणि महापालिकेच्या साहाय्याने ही कारवाई सुरू केली.. यापुढं एकही कॅफेत असले गैर प्रकार खपवून घेतले जाणार नाही असा इशारा पोलिसांनी दिलाय. कॅफे म्हणजे गप्पा मारणे, कॉफी चा आस्वाद घेणारी जागा, मात्र याच जागा काही समाजकंटकांनी त्यांच्या गैर कृत्यांचे अड्डे केले होते त्यातून आता प्रशंसा सरसावले आहे, कुठं असला प्रकार चालत असेल तर नागरिकांनी तक्रारी करावी कारवाई अटळ आहे असा इशारा दिलाय, त्यामुळं संभाजी नगरात सध्या ऑपरेशन हॅमर ची जोरदार चर्चा सुरू आहे.

काळ्या तेलात अन्न तळणाऱ्यांची आता खैर नाही

तुकाराम मुंढेंकडून हॉटेल व्यवसायिकांसाठी ऐतिहासिक आदेश जारी



मुंबई, अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी हॉटेल आणि रेस्टॉरंट्ससाठी जारी केलेल्या नव्या आदेशाविषयी माहिती दिली. तसेच या आदेशाचं पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. "मी 23 जूनला एक आदेश पारित केलेला आहे. हे आदेश हॉटेल, रेस्टॉरंट यांच्यासाठी आहेत. हॉटेल, रेस्टॉरंट यांनी पाळावायाच्या काही गोष्टी बंधनकारक आहेत. ग्राहकांच्या आरोग्य संरक्षणासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे", असं तुकाराम मुंढे म्हणाले.



"आम्ही राबवलेल्या विशेष मोहीम आणि सर्वेक्षणात गंभीर त्रुटी आस्थापनांमध्ये आढळल्या आहेत. जसे की, अस्वच्छ आणि आरोग्यास अपायकारक परिस्थितीत अन्न तयार करणे, वापरलेला खाद्य तेलाचा परत वापर करणे, वैद्यकीय तपासणी नसलेल्या कर्मचाऱ्यांकडून अन्न पडताळणी करणं, तापमान नियंत्रणात त्रुटी असणं, अन्न दजाहीन साहित्यात अन्न पदाथार्चे पॅकेजिंग करणं, ग्राहकांना सुरक्षित पाण्याचे पाणी उपलब्ध न करुण देणे आणि विविध अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणे या गंभीर त्रुटी आम्हाला आढळल्या आहेत. या गोष्टी नियमांचे उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे आम्ही पुन्हा याबाबत आदेश पारित केले आहेत", असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं.

आदेश कुणाकुणाला लागू होईल ?

"हे आदेश सर्व हॉटेल आणि रेस्टॉरंट्सला लागू होणार आहे. तसेच उपहारगृह, ढाबे, कँटिन, कॅफेटेरिया, बेकरी, मिठाईचे दुकानं, कॅटरिंग युनिट, फूड कॅटरस, जूस बास, विविध प्रकारचे किचनस, साखळी उपहारगृह, ई कॉमर्स आणि इतर ऑनलाइन फूड डिलिव्हरी कंपनी या सर्वांना हा आदेश लागू होईल. जिथे जेवण बनवलं जातं आणि लोकांना खाद्य म्हणून विकलं जातं तिथे हा कायदा लागू होईल", अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

तुकाराम मुंढे यांच्याकडून देण्यात आलेले आदेश पुढीलप्रमाणे:

- लायसन्सशिवाय रेस्टॉरंट आणि हॉटेल चालवता येणार नाही.
- स्वच्छता आणि आरोग्य नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचं आहे
- कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी आणि प्रशिक्षण गरजेचं आहे. कारण त्याला काही आजार असेल तर अन्नातून तो आजार पसरु शकतो
- कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगवेगळे ठेवणं गरजेचं आहे.
- गरम आणि थंड अन्नासाठी निर्धारित तापमान राखणे गरजेचं आहे.
- परवानाधारक पुरवठाधारकाकडून कच्चा माल खरेदी करणे
- ग्राहकांसाठी मोफत पिण्यायोग्य सुरक्षित पाणी उपलब्ध करुन देणं बंधनकारक आहे. आमच्याकडे पाणी नाही, बाटलीचं विकत पाणी मिळेल, असं बंधनकारक करता येत नाही. त्यावर आम्ही कारवाई करणार आहोत, असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं.
- वापरलेल्या खाद्य तेलाचा परत वापर करता येणार नाही. तेलचा वास यायला लागला, ते काळं दिसायला लागलं तर ते आरोग्यासाठी घातक असतं.
- ऑनलाइन विक्री होणाऱ्या अन्न पदार्थावर प्रत्येक ठिकाणी परवाना क्रमांक लागेल. कॅलरीची माहिती द्यावी लागेल. जेवढे किचन असतील त्या प्रत्येक किचनला वेगवेगळी परवानगी घ्यावी लागेल. मोठ्या कंपन्यांनी दरवर्षी किचनचे ऑडिट करणे आवश्यक आहे.

पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,०७ जुलै २०२६ ते १३ जुलै २०२६

आरोग्य

किशमिश आणि मनुका मध्ये काय फरक आहे, आरोग्यासाठी जास्त फायदेशीर काय?



किशमिश आणि मनुका दिसायला अगदी एकसारखे आहे, पण यांचे पोषकतत्व वेगवेगळे आहे. जाणून घ्या किशमिश किंवा मनुका आरोग्यासाठी जास्त फायदेशीर काय?

किशमिश आणि मनुका दोन्हीही आरोग्यासाठी फायदेशीर आहे. अनेक लोक यांना एकाच समजतात. पण दोघींमध्ये खूप अंतर आहे. किशमिश आणि मनुका ड्राई फ्रूट्स (वऑ फ्रुटस) लिस्ट मध्ये सहभागी आहे. किशमिश खाल्याने बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते. तर मनुका खाल्याने शरीरात रक्त वाढते.

किशमिश मनुका मधील फरक-

किशमिशचा आकार छोटा आणि बारीक असतो. मनुका मोठी आणि जाड असते. किशमिशचा रंग थोडा हल्का असतो. तर मनुका डार्क ब्राउन कलरची असते. किशमिशची चव थोडी आंबट असते आणि मनुका गोड असते. छोट्या द्राक्षांना वाळवून किशमिश तयारकेली जाते. यामध्ये बिया नसतात. मुनका मोठे आकाराचे द्राक्ष वाळवून तयार केली जाते मनुका मध्ये अनेक बिया असतात.

किशमिशचे फायदे-

किशमिशमध्ये आयरन, प्रोटीन, फाइबर, कॅल्शियम, मॅग्नाशीयम, पोटॅशियम, कॉपर आणि मॅगनीज असते. किशमिशला विटामिन बी६ चा सोर्स मानले जाते. किशमिश खाल्याने बद्धकोष्ठता दूर होते. फाइबरने भरपूर किशमिश पुरुषांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. लहान मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकास जलद करते. भिजवलेले किशमिश खाल्याने वजन कमी होते. हाडे आणि दात मजबूत ठेवण्यासाठी किशमिश खाणे फायदेशीर मानले जाते.

मनुकाचे फायदे-

मनुका मध्ये भरपूर कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नाशीयम, बीटा कॅरोटीन, अँटीबॅक्टिरियल गुण असतात. शरीरात रक्त वाढवण्यासाठी मनुका मदत करतात. फाइबरयुक्त भरपूर मनुका खाल्याने पाचन मजबूत होते. एनीमियाच्या रुग्णांनी मनुका खाव्या. ब्लड प्रेशर कमी झाल्यास मनुका खाव्या. हार्ट हेल्थ आणि कोलेस्ट्रॉलला नियंत्रित करण्यासाठी मनुका मदत करतात. मनुका दुधात किंवा पाण्यात भिजवून खाल्ल्यास फायदे मिळतात.

आरोग्यापासून ते त्वचेपर्यंत, कढीपत्त्याचे हे आश्चर्यकारक फायदे

कढीपत्ता भारतीय स्वयंपाकघरातील एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांचा उपयोग केवळ चव वाढवण्यासाठी मर्यादित नाही तर ते आरोग्यासाठी अनेक आश्चर्यकारक फायदे देखील देतात. कढीपत्त्याचा रंग गडद हिरवा आणि सुवासिक असतो, जो कोणत्याही डिशला एक विशेष स्पर्श जोडतो. चला तर जाणून घेऊया कढीपत्त्याचे हे उत्तम फायदे -

१. पाचक आरोग्य सुधारते

कढीपत्ता पचनसंस्थेसाठी अत्यंत फायदेशीर आहे. यामध्ये असलेले फायबर पचन प्रक्रिया सुलभ करते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम देते. याव्यतिरिक्त, ते पाचक एंजाइम सक्रिय करतात, ज्यामुळे अन्नाचे योग्य पचन होते. बरेच लोक कढीपत्त्याची चटणी किंवा डेकोक्शन बनवून देखील खातात, जे पचनास मदत करते.

२. वजन व्यवस्थापन

जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर कढीपत्ता तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. हे चयापचय वाढवण्यास मदत करतात, ज्यामुळे शरीरातील चरबीची योग्य विल्हेवाट लावण्यास मदत होते. कढीपत्त्याच्या नियमित सेवनाने तुम्हाला ऊर्जा मिळते आणि वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

३. रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करणे

कढीपत्त्यात असे गुणधर्म असतात जे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे विशेषतः फायदेशीर आहे. कढीपत्त्याच्या सेवनाने इन्सुलिन स्राव सुधारण्यास आणि रक्तातील ग्लुकोजची पातळी स्थिर ठेवण्यास मदत होते.

४. केसांसाठी फायदेशीर

कढीपत्ता केसांसाठी खूप फायदेशीर आहे. यातील पोषक घटक केसांची मुळे मजबूत करतात आणि केस गळण्याची समस्या कमी करतात. बरेच लोक कढीपत्त्याची पेस्ट बनवून टाळूवर लावतात, ज्यामुळे केसांना चमक येते आणि कोंडा सारख्या समस्या देखील दूर होतात.

५. त्वचेसाठी फायदेशीर

कढीपत्त्यात दाहक-विरोधी आणि बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. हे त्वचेशी संबंधित समस्या जसे की मुरुम, डाग आणि जळजळ कमी करण्यास मदत करतात. कढीपत्त्याची पेस्ट बनवून चेहऱ्यावर लावल्याने त्वचा सुधारते आणि त्वचेशी संबंधित इतर समस्यांपासूनही आराम मिळतो.



राग केल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो का?

आपल्या सर्वांना जीवनात कधी ना कधी राग येतो. ही एक सामान्य भावना आहे जी अनेक घटकांमुळे उद्भवू शकते. पण तुम्हाला माहित आहे का की राग आपल्या हृदयासाठी देखील धोका बनू शकतो? रागाचा हृदयावर होणारा परिणाम:

जेव्हा आपण रागावतो तेव्हा आपल्या शरीरात अनेक बदल होतात. हृदय गती वाढते, रक्तदाब वाढतो आणि हार्मोन्सची पातळी बदलते. हे बदल हृदयासाठी हानिकारक असू शकतात, विशेषतः जर तुम्ही आधीच हृदयविकाराने ग्रस्त असाल.



रागामुळे हृदयविकाराचा झटका कसा येऊ शकतो?

रागाच्या वेळी होणाऱ्या शारीरिक बदलांमुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, रक्त प्रवाह कमी होतो. यामुळे रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका वाढू शकतो, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

राग नेहमी हृदयासाठी धोकादायक असतो का?

प्रत्येक रागाचा हृदयावर नकारात्मक परिणाम होत नाही. रागाचे किरकोळ स्वरूप हृदयासाठी धोकादायक नाही. परंतु जर तुम्हाला वारंवार राग येत असेल किंवा तुमच्या राग तीव्र येत असेल तर ते तुमच्या हृदयासाठी धोकादायक ठरू शकते.

रागावर नियंत्रण कसे ठेवायचे?

१. दीर्घ श्वास घ्या: जेव्हा तुम्ही रागात असता तेव्हा दीर्घ श्वास घेतल्याने तुमचे शरीर शांत होते.

२. शांत होण्यासाठी वेळ काढा: जेव्हा तुम्ही रागावता तेव्हा स्वतःला शांत होण्यासाठी थोडा वेळ द्या.

३. समस्येवर उपाय शोधा: रागाचे कारण शोधण्याचा प्रयत्न करा आणि ते सोडवण्यासाठी काहीतरी करा.

४. तुमच्या भावना व्यक्त करा: तुमच्या भावना दडपण्याऐवजी त्या निरोगी मार्गाने व्यक्त करा.

५. योग आणि ध्यान करा: योग आणि ध्यान तणाव कमी करण्यास आणि रागावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतात.

रागाचा धोका कोणाला आहे?

आधीच हृदयविकाराने ग्रस्त लोक

उच्च रक्तदाब असलेले लोक

लठ्ठपणाशी संघर्ष करणारे लोक

धूम्रपान करणारे लोक

जे लोक दारू पितात

रागामुळे हृदयाला धोका निर्माण होऊ शकतो, खासकरून जर तुम्ही आधीच हृदयविकाराने ग्रस्त असाल.

तुमचे हृदय निरोगी ठेवण्यासाठी रागावर नियंत्रण ठेवणे खूप गरजेचे आहे. जर तुम्हाला वारंवार राग येत असेल किंवा तुमच्या रागाचे हल्ले खूप तीव्र असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.



त्वचा टोन वाढवण्यासाठी हे प्रभावी घरगुती उपाय



तुमची त्वचा सुंदर, निरोगी आणि आकर्षक दिसावी अशी तुमच्यापैकी प्रत्येकाची इच्छा असते. यासाठी तुम्ही पार्लरमध्ये किती तास बसून स्किन लाइटनिंग ट्रीटमेंट करून घेता. परंतु त्वचेचा रंग हलका करण्यासाठी महागड्या सौंदर्य उत्पादनांचा अवलंब करणे आवश्यक नाही. घरी उपलब्ध असलेल्या काही सोप्या आणि नैसर्गिक पद्धतींनी तुम्ही तुमच्या त्वचेचा रंग हलका करू शकता. येथे काही प्रभावी घरगुती उपाय आहेत जे तुमची त्वचा चमकण्यास मदत करू शकतात.

१. लिंबू आणि मध

लिंबूमध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, तर मध त्वचेला मॉइश्चरायझ करते.

वापरण्याची पद्धत

१ चमचा लिंबाचा रस आणि १ चमचा मध मिसळा.

हे मिश्रण चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटांनी धुवा.

आठवड्यातून २-३ वेळा वापरा.

२. कडुलिंबाची पेस्ट

कडुलिंबात अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, ज्यामुळे त्वचा स्वच्छ होण्यास मदत होते.

वापरण्याची पद्धत

कडुलिंबाची पाने बारीक करून पेस्ट बनवा.

चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटांनी धुवा.

३. आवळा पावडर

आवळा व्हिटॅमिन सी ने भरपूर आहे आणि त्वचेला चमकदार बनवण्यास मदत करतो.

वापरण्याची पद्धत

२चमचे आवळा पावडर आणि पाणी मिसळून पेस्ट बनवा.

चेहऱ्यावर लावा आणि ३० मिनिटांनी धुवा.

४. ग्रीन टी चा वापर

ग्रीन टीमध्ये अँटिऑक्सिडेंट असतात, जे त्वचेला ताजेतवाने आणि हलके करण्यास मदत करतात.

वापरण्याची पद्धत

ग्रीन टी बॅग गरम पाण्यात भिजवून बाहेर काढा.

ते थंड करून चेहऱ्यावर लावा. २० मिनिटांनी धुवा.

५. लिंबू आणि मध

लिंबूमध्ये सायट्रिक ऍसिड असते, जे त्वचेला हलके करण्यास मदत करते, तर मध मॉइश्चराइज करते.





एखादा कीटक चावला असेल तर सावधान!

कीटकांच्या चाव्याद्वारे अनेक लोकांवर परिणाम होतो आणि ही एक सामान्य घटना आहे. तथापि, याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये, कारण काही कीटक विषारी असू शकतात आणि त्यांचे आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. योग्य काळजी आणि सावधगिरीने, आपण कीटकांच्या चाव्याचे परिणाम कमी करू शकता आणि आरोग्य राखू शकता. कीटक चावल्यास काय करावे, त्याची लक्षणे आणि उपचार पद्धती या लेखात आपण जाणून घेणार आहोत.

१. कीटक चावल्याची लक्षणे

कीटक चाव्याव्दारे अनेक लक्षणे दिसू शकतात, यासह:

सूज: चाव्याच्या ठिकाणी लालसरपणा आणि सूज दिसू शकते.

वेदना किंवा खाज सुटणे: बर्याच लोकांना वेदना आणि खाज सुटणे जाणवते.

ताप: काही प्रकरणांमध्ये संसर्गामुळेही ताप येऊ शकतो.

चक्कर येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे: विषारी कीटक चावल्याने गंभीर लक्षणे उद्भवू शकतात.

२. कीटक चावल्यानंतर लगेच काय करावे?

जर तुम्हाला किंवा इतर कोणाला कीटक चावला असेल, तर पुढील उपाय करा:

स्वच्छ: चावलेली जागा साबणाने आणि पाण्याने पूर्णपणे धुवा. यामुळे संसर्गाचा धोका कमी होईल.

थंड शेक करा: सूज आणि वेदना कमी करण्यासाठी आइस कॉम्प्रेस लावा. ते थेट त्वचेवर ठेवू नका, परंतु कापडात गुंडाळलेले लावा.

वेदना निवारक: वेदना तीव्र असल्यास, तुम्ही नॉन-प्रिस्क्रिप्शन वेदनाशामक औषधे घेऊ शकता जसे कीइबुप्रोफेन किंवा एसिटामिनोफेन मात्र, एकदा डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या.

खाज सुटण्याचे औषध: खाज कमी करण्यासाठी अँटीहिस्टामाइन क्रीम किंवा लोशन वापरा.

३. डॉक्टरांशी कधी संपर्क साधावा

काही परिस्थितींमध्ये, आपण ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधावा:

जर चाव्याच्या ठिकाणी गंभीर प्रतिक्रिया असेल जसे की जास्त सूज, लालसरपणा किंवा तीव्र वेदना.

जर तुम्हाला ताप, चक्कर येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर ते विषारी कीटक चावल्याचे लक्षण असू शकते.

चावल्यानंतर स्थिती कालांतराने बिघडल्यास, वाढत्या संसर्गाची चिन्हे दिसू लागल्यास ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या.

४. कीटकांचे प्रकार आणि खबरदारी

हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की सर्व कीटक एकसारखे नसतात. याच्या मदतीने तुम्ही अनेक संभाव्य गुंतागुंत टाळू शकता.

डास: डास चावल्यामुळे त्वचा लाल होते, सुजते किंवा सूज येते. डास चावल्याने डेंग्यू किंवा मलेरियासारखे आजार पसरू शकतात.

फुलपाखरे आणि मधमाश्या: हे विषारी असू शकतात आणि एलर्जीची प्रतिक्रिया होऊ शकतात.

ढेकूण: हे लहान, सपाट, लाल-तपकिरी रंगाचे असतात जे त्वचेला चिकटतात. त्याच्या चाव्यामुळे फ्लू सारखी लक्षणे दिसू शकतात.

चिगर: याच्या चाव्यामुळे तुमच्या त्वचेवर लाल, खाज सुटलेल्या जखमा होतात.

५. कीटक टाळण्यासाठी उपाय

स्वच्छता : तुमच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवा. प्रभावित क्षेत्र साबण आणि पाण्याने धुवा.

संरक्षण: बाहेर जाताना लांब बाही घाला.

मच्छरदाणीचा वापर : झोपताना मच्छरदाणी वापरा.

नैसर्गिक रीपेलेंट्स: लेमन ग्रास किंवा टी ट्री ऑइल सारख्या नैसर्गिक रीपेलेंट्स वापरा.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, ०७ जुलै २०२६ ते १३ जुलै २०२६

संपादकीय

सौरभ, राजा, केतन... अजून किती?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

मुलंमुली एकसमान नारा देत आपणच मुलींना पुरुषी बनवतोय. बेटी बचाओ बेटी पढाओ या नादात पोर पोरी बिथरत चाललेत. हर महिला बेचारी नही आणि हर पुरुष अत्याचारी नही, असं सांगण्याची वेळ आली आहे. महिलांसाठी न्याय मागता मागता आता पुरुषांसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. आज महिलांमध्ये दडलेल्या या विकृतीमुळे सौरभ, राजा, केतन यांसारख्या निरागस तरुणांना जीव गमवावा लागतोय. पुण्यातील केतन अग्रवाल हत्या प्रकरणाने सगळा देशच सुन्न आहे. या घटनेत निरागस केतनचा गेलेला जीव काळजाला भिडणारा आहे. तर या घटनेनंतर आजवर फक्त महिला अत्याचारावर आवाज उठवणाऱ्यांचे मौन चिंतेचा विषय आहे. दुसरीकडे या घटनांवर सोशल मीडियावर तरुणाईचा सुरू असलेला मिश्र प्रतिक्रियांचा पाऊस मन विषण्ण करणारा आणि नव्या संवेदनहीन खुनशी समाजाची निर्मिती होत असल्याचा इशारा देणारा आहे. पण केतन अग्रवाल हत्या प्रकरणाचा मागोवा घेणंही महत्त्वाचं आहे. पुण्यातील बिजनेसमन विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतन याचे लग्न त्यांच्याच नात्यातील सिया गोयल या तरुणीबरोबर ठरले. दोन्ही कुटुंब आर्थिकदृष्ट्या संपन्न आणि हायफाय असल्याने लग्नही त्याच तोडीस तोड व्हावे यासाठी १७ कोटी रुपयात जयपूरमधील पॅलेस बुक करण्यात आला. दोन्ही कुटुंबांच्या पाहुण्यांच्या सोयीसाठी दोन विमानंही बुक करण्यात आली. नोव्हेंबरमध्ये हा शाही लग्नसोहळा पार पडणार असल्याने दोन्ही कुटुंब उत्साहात होती. केतनही आनंदात होता. कारण दोघेही नात्यातील असल्याने दोन्ही कुटुंब आणि केतन सियादेखील आधीपासूनच एकमेकांना ओळखत होते. फेब्रुवारीत दोघांचा साखरपुडाही दणक्यात झाला. सियाने त्याचे फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर टाकत आपण केतनबरोबर किती आनंदात आहोत हे जगाला दाखवलं. ती त्या दोघांमधील प्रत्येक लहान सहान गोष्टींचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर टाकत केतनबरोबर हॅप्पी असल्याचं दाखवत होती. पण दुसरीकडे ती केतनबरोबर सतत वाद घालत होती. यामुळे केतनही कन्फ्युज होता. तिच्या चिडचिड आणि रागाचे कारण त्यालाही कळत नव्हते. त्यामुळे त्याने पालकांना सियाची नीट चौकशी केली आहे का? असेही अनेकदा विचारले. यावर घरच्यांनी तिच्या कुटुंबाबरोबर ३५ वर्षांचे संबंध आहेत. सगळं चांगलं आहे सांगत केतनच्या मनातल्या किंतुला शांत केलं होतं. त्यामुळे सियाच्या तासनतास सतत बिझी असलेल्या फोनवरही केतनला कधी संशय आला नाही. तो फक्त कुटुंबावर विश्वास ठेवून भावी पत्नी म्हणून सियावर प्रेमाचा वर्षाव करत राहिला. तिच्या वाढदिवसासाठी अख्खं हॉटेल बुक करणारा, तिच्यावर फुलांचा वर्षाव करून तिला खूश पाहून आनंद मानणारा केतन खरं तर चांगला पती झाला असता. पण सियाचे चेतन नावाच्या तरुणावर प्रेम होते. तिला मुळी हे लग्नच करायचे नव्हते. केवळ कुटुंबाच्या दबावामुळे तिने लग्नास होकार दिला होता. पण हे सगळे सियाने १८ जूनला स्वतःच्या वाढदिवसाच्या दिनी चेतनच्या मदतीने केतनचा लोहगडावरून ढकलून खून केल्यानंतर पुढे आलेलं सत्य आहे. कदाचित हे कृत्य करण्यापेक्षा तिने आधीच केतनला



विश्वासात घेऊन लग्नास नकार असल्याचे सांगितले असते तर केतननेही त्यातून मार्ग काढला असता. तिची मदत केली असती. ते असेही एकमेकांच्या परिचयातलेच होते. कारण केतन बऱ्यापैकी समजदार असल्याचे अनेकांनी सांगितले आहे. पण या सगळ्या जर तरच्या गोष्टी आहेत. जे घडायचं ते घडून गेलंय. केतन आज जगात नाही. सिया आणि चेतनला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्यांच्यावर कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. यातून नेमकं काय बाहेर येणार? सिया चेतनला शिक्षा होणार की बेल मिळणार? याची उत्तरं मिळतीलच, पण याचे पडसाद जे समाजात उमटत आहेत ते समाजाचा पाया हलवणारे आहेतच, पण पालकांनाही हादरा देणारे आहेत. काहींनी यात सियाचे समर्थन केले आहे. आपल्या पुरुषसत्ताक देशात महिलांवर कायम अत्याचार होत आहेत. स्त्रियांच्या भावनांचा विचार न करता, तिच्या विचारांना महत्त्व न देता तिच्या लग्नाचा निर्णय घेतला जातो. पुढे जाऊन त्याचे गंभीर परिणाम तिच्या जीवनावर होतात. असा दावा करत अनेकजण सिया फक्त २० वर्षांची मुलगी आहे, असे सांगत तिला पाठिंबा देत आहेत. तर अशाप्रकारे प्रियकराच्या मदतीने पतीला ठार करर्णाया महिला गुन्हेगारांच्या यादीत सियाच्या नावाचीही नोंद झाली आहे. प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या करून त्याच्या शरीराचे तुकडे निळ्या ड्रममध्ये भरणारी मुस्कान, तर लग्नानंतर हनिमूनसाठी मेघालयाला गेल्यावर पतीला मित्रांच्या मदतीने कड्यावरून खाली ढकलून त्याची हत्या करणारी सोनम रघुवंशी आणि सिया यात कमालीचे साम्य आहे. दोन्ही कुटुंब बिझनेसवाली आहेत. त्यामुळे पैशांसाठी या हत्या झालेल्या नाहीत. तर केवळ प्रेमाच्या त्रिकोणातून झालेल्या आहेत. उत्तर प्रदेशातील सौरभची हत्या त्याची पत्नी मुस्कान हिने प्रियकराच्या मदतीने केली. सौरभला मद्य पाजून त्याच्या छातीत, पोटात सुऱ्याने सपासप वार करून मुस्कान आणि तिच्या प्रियकराने त्याची निर्घृण हत्या केली. नंतर मृतदेहाचे तुकडे निळ्या ड्रमात भरून त्यात सिमेंट टाकून फेकण्यात आला. पण सौरभच्या कुटुंबाला संशय आला आणि सत्य समोर आले. या घटनांची नोंद मीडियाने घेतल्यानेच त्याची सरकारने दखल घेतली. पण आज अशा अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत आहेत. ज्यात महिलांकडून सुसंस्कृत घरातील मुलांचं आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. मुलांना ठार केलं जात आहे. कायद्याच्या बळाचा गैरवापर करत अनेक विवाहित पुरुषांचा पत्नीकडून छळ होत आहे. याला कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांमध्ये भारतीय पुरुषांचा क्रमांक प्रथम आहे. यात ८२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पण केवळ पुरुष असल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून फक्त महिला अत्याच्याराच्या घटनांना रंगवणं आता बंद करायला हवं. जेव्हा या असुरी वृत्तीला कायद्याचं बळ मिळतं तेव्हा ते त्या एकट्या व्यक्तीला मिळत नसतं तर त्यातून हजारो लाखो असुरी व्यक्ती घडतात. कायदा आपलं काहीच करू शकत नाही याचा विश्वास नव्हे खात्रीच असल्याने आज अशा अनेक केसेसमध्ये महिलांना कठोर शिक्षा झाल्याचे ऐकिवात व वाचनात नाही. त्यामुळेच मुस्कान, सोनम, सिया यासारख्या असंख्य तरुणी आज संस्कार, संवेदना, नातं, भावना यांना तिलांजली वाहत पुरुषांचे मुडदे पाडत सुटल्या आहेत. एकीचं बघून दुसरीला बळ मिळतंय. समाजात असंतोष वाढलाय. कोणत्याही गुन्ह्यात स्त्री पुरुषांना वेगवेगळा न्याय मिळता कामा नये. राजाची हत्या करणाऱ्या सोनमला बेल मिळाली त्यामुळेच सियासारख्या तरुणींची पतीला ठार मारण्याची हिंमत होतेय, असा आरोप राजाच्या आईनेच केला आहे. जो शंभर टक्के खरा आहे. कारण आपण काहीही केलं तरी कायदा आपल्याच बाजूने असल्याचा फाजील विश्वास महिलांना आलाय. कौटुंबिक हिंसाचारविरोधी कायद्याचाही असाच गैरवापर होत आहे. पतीला वेठीस धरून त्याच्याकडून पैसे उकळून बॉय फ्रेंडबरोबर एन्जॉय करण्याचा प्लान आखूनच अनेक तरुणी धनाढ्य मुलांना जाळ्यात अडकवत आहेत. घटस्फोटाच्या केसेसमध्ये त्यांचा हा खरा चेहरा बघून न्यायालयही विचारात पडू लागले आहे. लग्न या पवित्र विवाह संस्थेचे बदलते हे रुप समाजासाठीच नाही तर तुमच्या आमच्या मुलांसाठीही घातक आहे. विशेष म्हणजे या सगळ्या घटनांमध्ये आरोपी असलेल्या तरुणतरुणी तिशीच्या आतील आहेत. जेन झी आहेत. आत्मकेंद्रित असल्याने समोरच्यांचा विचार करण्याची वृत्तीच यांच्यात कधी विकसित झालेली नाही. किंबहुना पालकांनी त्यांना तसंच घडवलंय. पैशाने जग जिंकता येतं हे या धनाढ्य घरातील लेकीबाळींनी डोक्यात ठेवलंय. सुखी आयुष्य म्हणजे खिशात बक्कळ पैसा, ड्रग्ज, पार्ट्या, सेक्स, फॉरेन ट्रीप असा समज असलेली पिढी आपण वाढवतोय. मुलं मुली एकसमान नारा देत आपणच मुलींना पुरुषी बनवतोय. बेटी बचाओ बेटी पढाओ या नादात पोर पोरी बिथरत चाललेत. हर महिला बेचारी नही आणि हर पुरुष अत्याचारी नही, असं सांगण्याची वेळ आली आहे. महिलांसाठी न्याय मागता मागता आता पुरुषांसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. आज महिलांमध्ये दडलेल्या या विकृतीमुळे राजा, सौरभ, केतन यांना जीव गमवावा लागलाय. यामुळे बिघडलेल्या मुलींना सुधरवण्यासाठी त्यांचे लग्न लावून दुसऱ्याच्या घरातले दीपक न विझवता आपल्या मुलींना सुधरवण्याचे आव्हान पालकांपुढे आहे. नकोतेवढं स्वातंत्र्य देऊन आपण मुलामुलींना बिघडवतोय की सुधरवतोय हे पालकांनी वेळीच ओळखायची वेळ आली आहे. अन्याय मग तो स्त्रीवर झालेला असो वा पुरुषावर पीडितांच्या बाजूने उभे राहणे हे कायदा जिवंत असल्याचं लक्षण आहे. फक्त यात स्त्री-पुरुष भेद येता कामा नये, यातही एकसमानता असायली हवीच. तरच समाज सुधारतोय असं म्हणता येईल. याच पार्श्वभूमीवर केतनलाही न्याय मिळेल हीच आशा.

पारदर्शकतेची कसोटी



परीक्षा केवळ सुरक्षेच्या चौकटीत बंदिस्त न होता, विश्वासाचा नवा अध्याय लिहिणे गरजेचे आहे, तंत्रज्ञानाच्या प्रगत हातांनी, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सावरून घेणे गरजेचे आहे. संवेदनेची जोड आणि उत्तरदायित्वाचे भान जेव्हा व्यवस्थेत उतरेल खऱ्या अर्थाने, तेव्हाच शैक्षणिक क्रांतीचा सूर्योदय होईल. भारतात वैद्यकीय प्रवेशासाठी घेतली जाणारी 'नीट-यूजी'परीक्षा ही केवळ एक प्रवेश परीक्षा नसून, ती कोट्यवधी विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची किल्ली आहे. ३ मे रोजीच्या मूळ परीक्षेत तांत्रिक अनियमितता समोर आल्या आणि त्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती नक्कीच दुर्दैवी होती. मात्र, अशा आव्हानात्मक परिस्थितीत डगमगून न जाता, २१ जून रोजी कडक सुरक्षेच्या सावटाखाली यशस्वीपणे पुनर्परीक्षा पार पाडणे, हे सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या तत्परतेचे प्रतीक आहे.शांततेत पार पडलेली ही प्रक्रिया केवळ एक परीक्षा नव्हती, तर शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचे पुनर्स्थापन करण्यासाठी सरकारने टाकलेले एक महत्त्वाचे आणि आश्वासक पाऊल होते. कोणत्याही मोठ्या व्यवस्थेत बदल घडताना सुरुवातीला अडथळे येणे स्वाभाविक असले, तरी २१ जूनच्या परीक्षेचा बंदोबस्त एखाद्या युद्धजन्य परिस्थितीसारखा होता, हे नाकारता येणार नाही. सीआरपीएफ, सायबर कमांडो, १.४ लाख सीसीटीव्ही आणि ५१ हजारांहून अधिक सिग्नल जॅमर्स अशा अभूतपूर्व यंत्रणा तीन तासांच्या परीक्षेसाठी तैनात कराव्या लागल्या. १७ ते २० वयोगटातील लाखो विद्यार्थ्यांना ज्या कठोर बायोमेट्रिक आणि शारीरिक तपासणीला सामोरे जावे लागले, ते कोणत्याही सुजाण व्यवस्थेला शोभा देणारे नाही. केवळ एका परीक्षेसाठी सरकारी यंत्रणेची ही पूर्ण शक्ती पणाला लावणे हे दीर्घकालीन धोरण म्हणून निश्चितच टिकाऊ नाही. या सुरक्षेवर झालेला अवाढव्य खर्च महत्त्वाचा नसून, प्रशासकीय ढिसाळपणामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना ज्या मानसिक आणि भावनिक वेदना सहन कराव्या लागल्या, त्याचे मोजमाप कोणाकडेच नाही. परीक्षा रद्द झाल्याच्या कालावधीत विद्यार्थ्यांची झालेली हताश मनस्थिती, ही आपल्या शिक्षण व्यवस्थेसाठी निश्चितच एक मोठी शोकांतिका आहे. शिक्षण क्षेत्रात सुधारणा करणे ही एक निरंतर प्रक्रिया आहे. केंद्रीय पद्धतीने परीक्षा घेतल्यामुळे संपूर्ण देशात समान निकष आणि संधी उपलब्ध होतात, हा या पद्धतीचा मोठा फायदा आहे. भविष्यात परीक्षा संगणक आधारित करण्याचा निर्णय घेऊन 'एनटीए'ने आधुनिकतेची कास धरली आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढेल, यात शंका नाही. तांत्रिक आव्हाने असली तरी, त्यातून धडा घेत सरकारने प्रगत सायबर सुरक्षा प्रणाली सज्ज केली आहे. तंत्रज्ञानाचा आजार तंत्रज्ञानानेच बरा करणे, ही काळाची गरज आहे आणि सरकार त्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात, आपण जुन्या पद्धतींना चिटकून न राहता अधिक सक्षम आणि डिजिटल सुरक्षितता असलेल्या प्रणालीकडे वळणे ही काळाची गरज आहे.चीनमधील 'गाओकाओ' परीक्षेच्या धर्तीवर भारताने आपल्या व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. तिथे यंत्रणेचा काटेकोरपणा आणि प्रश्नपत्रिका काढणाऱ्यांचे गुप्त ठेवले जाणारे स्थान भारतासाठी नक्कीच विचार करायला लावणारी गोष्ट आहे. आपण त्या दिशेनेच वाटचाल करत आहोत. आजची तरुण पिढी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जागरूक झाली आहे, हे लोकशाहीच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे; मात्र, 'कॉक्रोच जनता पार्टी' यांसारख्या उपरोधिक संज्ञांचा वापर करून जो आक्रोश व्यक्त केला जात आहे, त्याकडे केवळ 'लोकशाही अभिव्यक्ती' म्हणून पाहणे ही मोठी चूक ठरेल. हा आक्रोश खऱ्या अर्थाने व्यवस्थेतील सुधारणांसाठी आहे की गोंधळ आणि अस्थिरतेचा फायदा घेऊन आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न, याचाही विचार होणे आवश्यक आहे. ही टीका काही अंशी संधीसाधूपणाची असली तरी, त्यामागे विद्यार्थ्यांचा खदखदणारा असंतोष आहे, हे सरकारला नाकारता येणार नाही. सोशल मीडियाचा वापर हा संवादासाठी असावा, विरोधासाठी नसावा, याची जाणीव तरुण पिढीला असणेही तितकेच गरजेचे आहे. सरकार आता व्यवस्था अधिक विकेंद्रित आणि पारदर्शक करण्यासाठी एक सर्वंकष आराखडा तयार करत आहे. 'एनटीए'ला अधिक सक्षम बनवणे, विद्यार्थ्यांच्या हिताचे रक्षण करणे आणि परीक्षा प्रक्रियेत लवचिकता आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. परंतु, सुधारणा केवळ सुरक्षेच्या भिंती कडक करण्यात नाही, तर पारदर्शक, लवचिक आणि उत्तरदायी रचनेच्या निर्मितीत आहे, हे सरकारनेही गांभीर्याने ओळखले पाहिजे. केवळ कडक बंदोबस्त करणे म्हणजे मूळ समस्येवर सुधारणा नव्हे. व्यवस्थेतील त्रुटींचे निराकरण करण्यासाठी धोरणात्मक बदलांची गरज आहे. 'एनटीए'च्या कामात अधिक वैधानिक स्पष्टता आणणे आणि विद्यार्थ्यांच्या आर्थिक नुकसानभरपाईची हमी देणारा कडक कायदा करणे ही काळाची गरज आहे. ही यंत्रणा केवळ सरकारी आदेशावर चालणारी नसावी, तर ती विद्यार्थ्यांप्रती उत्तरदायी असावी. संस्थात्मक अपयश झाल्यास विद्यार्थ्यांना दिलासा देणारी एखादी ठोस तरतूद असणे, हे त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी गरजेचे आहे. परीक्षा शुल्क परत करण्यापलीकडे जाऊन, विद्यार्थ्यांच्या वेळेची आणि श्रमाची किंमत सरकारने समजून घेतली पाहिजे. प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीला योग्य न्याय मिळावा, यासाठी सरकार सर्वंकष प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित करणे ही केवळ त्यांची जबाबदारी नसून, ती संपूर्ण व्यवस्थेची सामूहिक बांधिलकी आहे. ही व्यवस्था येत्या काळात अधिक सक्षम आणि आदर्श ठरेल, यात शंका नाही; परंतु त्यासाठी प्रशासकीय उत्तरदायित्व आणि विद्यार्थ्यांशी असलेला संवाद अधिक पारदर्शक असणे अत्यंत अनिवार्य आहे. आपण एका अशा वळणावर उभे आहोत, जिथे केवळ तंत्रज्ञान चालणार नाही, तर मानवी संवेदनशीलताही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे. शेवटी, विद्यार्थ्यांनी संयम ठेवावा आणि सरकारने संवेदनशीलतेची कास धरावी, तरच या परीक्षेचा गदारोळ थांबून यशाचा मार्ग प्रशस्त होईल.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./९७७/२६-२७

दिनांक :- ०१/०७/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-५	NL२८/१०५/१९	३५५८२	ए के. मेहता	ब्रम्हदेव रामकुबेर यादव/प्रेमादेवी यादव
२	निळेमोरे-५	NL२८/८९/२१	३५४५३	घोजारिया मोहम्मद साबीर अब्दूल रहीम	मोहसीन हसन शेख/असो मोहसीन शेख
३	निळेमोरे-५	NL२८/६८/२३	३५६०८	सचिनम सी गुरुस्वामी	सुमैला शकीर खान/रिझवाना शकीर खान
४	निळेमोरे-५	NL२८/१०७/४०	३५४२२	ए के. मेहता	लक्ष्मी किशन सिंह सोलंकी व सिंह सोलंकी
५	निळेमोरे-५	NL२८/६/५	३५४१४	निजामुद्दीन एस काझी	इम्रान निजामुद्दीन काझी/सादीक निजामुद्दीन काझी
६	निळेमोरे-५	NL२८/१०५/७	३५४२१	ए के. मेहता	श्रवणकुमार भाटी व गुजवती शांतीलाल भाटी
७	निळेमोरे-५	NL२८/११२/७६	३६२६१	रिध्दी विनायक रियलटर्स	पुनम रामचरण शुक्ला
८	निळेमोरे-५	NL२८/१०७/७८	३६१६२	ए के. मेहता	गिरजा विनोद दूबे/विनोद सुरजा दुबे
९	निळेमोरे-५	NL२८/७८/३४	३७७०९	सिताराम बिल्डर्स	सावित्रीदेवी राजेश्वर गुप्ता
१०	निळेमोरे-५	NL२८/९०/५२	३७६९६	श्रीराम बिल्डर्स	राजेंद्र जी मल्लाह
११	निळेमोरे-५	NL२८/२/३	३७६४१	एन ए काझा	मोहम्मद अस्लम मोहम्मद शमीन खान
१२	निळेमोरे-५	NL२८/९०/६८	३७३३४	शंकर लक्ष्मण झगडे	स्वेता कैलास बोहरा/प्रमोद कैलास बोहरा
१३	निळेमोरे-५	NL२८/१/६६	३५७७२	मोहम्मद मारुक शोहरन अली खान	सानिया सीनम दिवकर
१४	निळेमोरे-५	NL२८/९१/७१	३८०९४	मोहम्मद जैस चौधरी	कमरजहा जैस चौधरी
१५	निळेमोरे-५	NL२८/३६/१०	३८१३८	अम्युअल कुंदर	लक्ष्मी राजेश कळमकर
१६	निळेमोरे-५	NL२८/१०४/२१९	३७९२९	शौकीन कुमार एन जैन/क्रतुराज	स्वाती सत्यवान साळुंखे
१७	निळेमोरे-५	NL२८/१०८/३१	३८६२६	अपना साई बिल्डर्स	नदिम अहमद शेख/शहनाज नफीस शेख
१८	निळेमोरे-६	NL२९/५२/४	३६२७६	विजय बेजामिन दिब्रीटो	आशा मॅथ्यु डिसोजा
१९	निळेमोरे-६	NL२९/५२/५	३६२७५	जोस्तना विजय दिब्रीटो	आशा मॅथ्यु डिसोजा
२०	निळेमोरे-६	NL२९/१९७/२२५	३६३८५	सुमतीनाथ बिल्डर्स	द्रविन चौहान चुन्टु टी चौहान

सही

(मेधा वर्तक)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, ०७ जुलै २०२६ ते १३ जुलै २०२६

११ वर्षीय मुलीचे अपहरण... लैंगिक अत्याचारानंतर हत्या, कॅब चालक जेरबंद!

नाशिक। दिल्लीतील मेहरौली भागात राहणाऱ्या ११ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कुटुंबीयांसोबत फुटपाथवर झोपलेल्या या चिमुरडीचे पहाटेच्या सुमारास अपहरण करण्यात आले होते. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी तातडीने कारवाई करत सीसीटीव्हीच्या मदतीने अवघ्या ६ तासांत एका नराधम कॅब चालकाला अटक केली आहे. ही घटना सोमवारी (२२ जून) पहाटे घडली. मुलगी अचानक गायब झाल्याचे लक्षात येताच पालकांनी शोध सुरू केला आणि अपहरण झाल्याच्या संशयावरून मेहरौली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.



सीसीटीव्हीमधून आरोपीचा शोध

पीटीआयच्या वृत्तानुसार, तक्रार मिळताच पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तपासादरम्यान एका कॅब चालकाची हालचाल संशयास्पद आढळून आली. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३०-३५ वयोगटातील आणि मूळचा बिहारचा रहिवासी असलेल्या आरोपीने, पहाटे सुमारे पाच वाजता झोपेत असलेल्या मुलीचे अपहरण केले. त्यानंतर पोलिसांनी तिचा शोध घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम हाती घेतली.

२० पथकांची शोधमोहीम

मुलीचा शोध घेण्यासाठी जवळपास २० पोलिस पथके तयार करण्यात आली होती. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि आरोपीच्या हालचालींवर नजर ठेवून पोलिसांनी त्याचा माग काढला. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा केल्यानंतर आरोपी पुन्हा घटनास्थळाच्या परिसरात आला होता. मात्र तेथे पोलिसांची उपस्थिती पाहून तो पळून गेला. त्यानंतर त्याचा पाठलाग करून पोलिसांनी अवघ्या सहा तासांत त्याला अटक केली. लैंगिक अत्याचारानंतर हत्या

पोलिसांनी सांगितले की, चौकशीदरम्यान आरोपीने मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची कबुली दिली. त्यानंतर तिचा गळा आवळून हत्या केल्याचेही त्याने मान्य केले. गुन्हा लपवण्यासाठी आरोपीने मुलीचा मृतदेह फरीदाबाद-गुरुग्राम मार्गालगतच्या जंगल परिसरात फेकून दिला होता. आरोपीच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सोमवारी रात्री मृतदेह ताब्यात घेतला.

फॉरेन्सिक तपास सुरू

मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, मृत्यूचे नेमके कारण आणि इतर वैद्यकीय पुरावे तपासले जात आहेत. फॉरेन्सिक पथकाने अपहरणस्थळ आणि मृतदेह सापडलेल्या जंगल परिसरात सखोल तपास केला असून, विविध नमुने व पुरावे गोळा करण्यात आले आहेत. पोलिस या प्रकरणात आरोपीने हा निर्घृण गुन्हा एकट्याने केला की त्याचे आणखी साथीदार होते, यासह आरोपीचा पूर्व गुन्हेगारी इतिहास तपासत आहेत.

लग्न करण्यास अन् मुलाला पहिल्या नवऱ्याकडे सोडण्यास नकार
लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीच्या मुलाला संपवलं

पुणे। लग्न करण्यास नकार देणे आणि तीन वर्षीय मुलाला पहिल्या नवऱ्याकडे सोडण्यास नकार दिल्याच्या रागातून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीच्या मुलाचा खून केल्याची धक्कादायक घटना रांजणगाव परिसरात घडली. याप्रकरणी रांजणगाव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (२) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राणी पप्पू कोल (वय २५, सध्या रा. कारेगाव, कल्याणी कंपनीमागे, मूळ रा. अनुपपूर, मध्य प्रदेश) यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यावरून देवांशु आदित्य साहू (मूळ रा. बरटोला, अनुपपूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती तपास अधिकारी उपनिरीक्षक शिवाजी मुंढे यांनी दिली.

राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीचं प्रमाण वाढत चाललं आहे. अशातच पुण्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनं संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.



सासरच्या छळाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

मूल होत नसल्याच्या कारणावरून पती व सासूकडून सातत्याने होणारा मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून सिंहगड रस्ता परिसरात २७ वर्षीय आयटी अभियंता तरुणीने राहत्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पती, सासू आणि इतर नातेवाइकांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीप्ती प्रदीप एकशिंगे (वय २७, रा. मणिकबाग, सिंहगड रस्ता) असे मृत तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी तिचे भाऊ डॉ. किरण तुषार दुधबळे (वय ३०, रा. चामोर्शी, जि. गडचिरोली) यांनी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पती प्रदीप विठ्ठल एकशिंगे, सासू सुरेखा विठ्ठल एकशिंगे तसेच इतर नातेवाइकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्ती मूळची गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी येथील रहिवासी होती. ती आणि प्रदीप एकशिंगे हे दोघेही एका आयटी कंपनीत कार्यरत होते. नोकरीदरम्यान झालेल्या ओळखीचे प्रेमात रूपांतर झाले आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी दोघांनी पुण्यात प्रेमविवाह केला. विवाहानंतर काही काळातच मूल होत नसल्याच्या कारणावरून दीप्तीला पती आणि सासूकडून वारंवार टोमणे मारले जात होते. तिला मानसिक त्रास देण्याबरोबरच मारहाणही केली जात असल्याचा आरोप आहे.

'लिव्ह-इन'मधून चिमुकल्याचा खून

तक्रारदार महिला आणि आरोपी हे मूळचे मध्य प्रदेशातील आहेत. ते नोकरीनिमित्त रांजणगाव परिसरात स्थायिक आहे. त्या दोघांत प्रेमसंबंध होते. गेल्या सहा महिन्यांपासून दोघे कारेगाव येथे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. आरोपीला तक्रारदाराशी लग्न करायचे होते. मात्र, तिने लग्न करण्यास नकार दिला; तसेच आपल्या तीन वर्षीय मुलगा अंशु पप्पू कोल याला नवऱ्याकडे गावी सोडण्यासही नकार दिल्याने आरोपी संतप्त झाला. १७ जून रोजी दुपारी १२.३० ते सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान कल्याणी कंपनीमागील खोली क्रमांक ३७मध्ये ही घटना घडली. तक्रारीनुसार, आरोपी देवांशु साहू याने रागाच्या भरात तीन वर्षीय अंशुवर तोंड, ओठ, डोळे आणि नाकाच्या भागावर कशातरी वस्तूने मारहाण केली. या मारहाणीत चिमुकल्याचा मृत्यू झाला. महिला घरी परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

गेस्ट हाऊसमध्ये एक महिला आणि 6 पुरूष, 'नको तसलं' रॅकेट अन्..



पोलिसांनी छापेमारी करत सेक्स रॅकेट भांडाफोड केला. या प्रकरणाची सूचना दिल्यानंतर, तक्रार नोंदवून घेतली. पोलिसांच्या छापेमारीत एक महिला आणि सहा पुरूष आढळून आले होते, त्यांना कस्टडीत टाकण्यात आले. घटनास्थळावरून काही साहित्य देखील जप्त केले होते. पोलिसांनी गेस्ट हाऊसच्या खोल्यांना सील केले.

पुणे। बिहारच्या सहरसामध्ये पोलिसांनी छापेमारी करत सेक्स रॅकेट भांडाफोड केला. या प्रकरणाची सूचना दिल्यानंतर, तक्रार नोंदवून घेतली. पोलिसांच्या छापेमारीत एक महिला आणि सहा पुरूष आढळून आले होते, त्यांना कस्टडीत टाकण्यात आले. घटनास्थळावरून काही साहित्य देखील जप्त केले होते. पोलिसांनी गेस्ट हाऊसच्या खोल्यांना सील केले.

गेस्ट हाऊसमध्ये पोलिसांच्या छापेमारील एक महिला आणि 6 पुरूष..

दरम्यान, मंगळवारी संबंधित पोलीस ठाणे क्षेत्रात रिफ्यूज वसाहतीच्या गेस्ट हाऊसमध्ये पोलिसांनी तक्रारीच्या आधारे छापा टाकला होता. याचदरम्यान पोलिसांनी एक महिला आणि 6 पुरूषांना ताब्यात घेतले. गेस्ट हाऊसच्या खोलीतून पोलिसांनी अपत्तीनजक सामान जप्त केले.

गेस्ट हाऊसमध्ये बऱ्याच दिवसांपासून देह व्यापार

एसडीपीओ आलोक कुमार, हेडक्वार्टर डीएसपी कमलेश्वरी प्रसाद सिंह आणि एसटीएफ पोलिसांनी छापा टाकत प्रकरणाचा तपास केला. आरोप असा की, गेस्ट हाऊसमध्ये बऱ्याच दिवसांपासून देह व्यापार सुरू होता. गेस्ट हाऊस संचालक सकाळी 9 वाजता सायंकाळी 5 वाजेपर्यंत तरुणींसह महिलांना बोलवाचा. क्लायंटकडून मोठी रक्कम देखील घेतली जायची.

या प्रकरणात एसडीपीओ आलोक कुमार यांनी सांगितलं की, पोलीस ठाणे अध्यक्ष रिफ्यूजी वसाहतीत एका दुकानात अनैतिक देहव्यापार सुरू होता. सूचना मिळाल्यानंतर ठाणे अध्यक्ष पोलीस पथकासोबत घटनास्थळी दाखल झाले. पोलीस पथकाने घटनास्थळावरून वस्तू जप्त केल्या. या प्रकरणात गुन्हा दाखल करून गेस्ट हाऊसचे संचालक विरोधात कारवाईची मागणी केली.

एसडीपीओने सांगितलं की, छापेमारी दरम्यान, एक महिला आणि 6 पुरूषांना गेस्ट हाऊसमधून ताब्यात घेण्यात आलं. तसेच इतर खोल्यांना सील करण्यात आले.

अयोध्येत देणगी चोरीचा खेळ कुणी केला? मास्टरमाइंड कोण?
ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्थ अनिल मिश्रांचा राजीनामा

मुंबई। हिंदूंच्या श्रद्धेचे सर्वात मोठे प्रतीक मानल्या जाणाऱ्या राम मंदिरात गेल्या काही दिवसांपासून देणगी चोरीच्या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र आता प्रभू रामांच्या नावावर अयोध्येत लूट करणारे आरोपी कायद्याच्या तावडीतून सुटणार नाहीत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कठोर भूमिकेनंतर तपासात एकामागोमाग एक नवे खुलासे समोर येत आहेत. हिंदूंच्या श्रद्धेशी खेळ करणाऱ्या सर्व आरोपींवर कायद्याचा फास अधिक घट्ट होत चाललाय. देणगी चोरीप्रकरणी पोलिसांनी सर्व आठ आरोपींना अटक केलीय. याशिवाय, चोरीच्या प्रकरणात आरोपींच्या कबुलीजबाबावरून योगी सरकारची पोलिस यंत्रणा अयोध्येतील विविध भागांत छापेमारी करतेय. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांच्या चालकासह एकूण आठ जणांना आरोपी करण्यात आलंय. ज्यानंतर चंपत राय यांच्यासह विश्वस्थ अनिल मिश्रा यांना तडकाफडकी राजीनामा दिला. पण, राममंदिराच्या एफआयआरमध्ये मात्र चंपत राय, डॉ. अनिल मिश्रा तसेच इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची नावे समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. देणगी चोरीच्या प्राथमिक तपासात रमाशंकर यादव उर्फ टिन्नू याची भूमिका महत्त्वाची मानली जातेय. मात्र लवकरच आणखी काही जणांची नावेही समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल सुरू केला आहे. राममंदिर दानचोरी प्रकरणात केवळ छोट्या आरोपींना अटक करण्यात आल्याचा विरोधकांचा आरोप आहे. याप्रकरणात मोठ्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला जातोय. मात्र या संपूर्ण प्रकरणाचे सत्य तपास पूर्ण झाल्यानंतरच समोर येणार आहे.

सध्या अटक करण्यात आलेले 8 आरोपी कोण?
- रमाशंकर यादव उर्फ टिन्नू
- अनुकल्प मिश्रा
- अविनाश शुक्ला
- करुणेश पांडेय
- मनीष यादव
- लवकुश मिश्रा
- रमाशंकर मिश्रा
- सुभाष श्रीवास्तव



वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती डी आचोळे, नालासोपारा (पु)

दुरध्वनी क्रं. ७२१९३७०००६ / ७२१९३७०००९

जावक क्र. वविशम /कवि/३३१/२०२६-२०२७

दिनांक -०१/०७/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	आचोळे -०९	६०६/१४	३५८३८	प्रकाश सखाराम भाटकर	नवनीत कुमार
२	आचोळे-०९	७०८/१४	३५८२६	रामरंग श्यामलाल मौर्या	बनवासी संपत पाल
३	आचोळे -०९	६९८/२३	३५८०९	विशाल विजय पुजारे	इंद्रजीत सिंह कोरंगा
४	आचोळे ०७	६६/१९	३५७६१	तरुणा नितीन दर्जी	राजमनी अरविंद मौर्या
५	आचोळे -०८	१२५/५०	३५८०६	कृष्णा रघुनाथ गावडे	ज्योती श्रीनिवास मच्छा
६	आचोळे -०८	७१/३४	३५८०३	मंकेसरी जयराम मौर्या	सुबेदार मौर्या व इतर
७	आचोळे-९/१	७००/४२	३५८४३	अजितकुमार आचार्य	पंकजकुमार तिवारी व कुमारी शेफाली
८	आचोळे-९/१	६४८/३७	३५८४७	एंजल इंन्फ्रा	श्याम शंकर मदनलाल सोनी व मदनलाल रामदास सोनी
९	आचोळे-९/२	७६१/५०	३५८१९	शाहजानबेंगू अफजल खान	श्याम बाबू कलश राम
१०	आचोळे-९/२	६३४/२८४	३५८५४	मणाल डी सामंत	महेद्र रामजी शुक्ला सविता महेंद्र शुक्ला
११	आचोळे-१०	४९८/३९	३५८१४	संगिता मुकेश चंदळिया	संजय भुंडुराम डूगलच
१२	आचोळे-१०	४७/१३	३५८३९	राजेश राममोहन कामत	मेलवीन टी नाडार व कोरकूनम मेलवीन नाडार
१३	आचोळे-०१	९३/१९	३५७८९	हेमंत जोशी व भानूमती हेमंत जोशी	डुंगाराम केसाजी माळी
१४	आचोळे-०२	१६६/२४	३५७५६	सरोज सुरेश बोहत व सुरेश बी बोहत	आदित्य संतोष डिके
१५	आचोळे -०२	५१/१५	३५७५९	प्रविण डी कुमठा	आश्विनी मारुती घडशी
१६	आचोळे -०३	११२/४५	३५८५२	दिप डेव्हलपर्स	प्रगती प्रकाश सावंत व प्रकाश गंगाराम सावंत
१७	आचोळ -०४	२२४/३	३५७६६	नामदेव मारुती पाष्टे	दिशा विलास नागवेकर
१८	आचोळे-०४	२१९/३१	३५८०१	उर्मीला कोमल यादव	कोमल लालचंद यादव
१९	आचोळे -०६	३४/२	३५८४९	दिवाकर गोविंद घिरड	मनिष मनोहर भुवड व मानाली मनिष भुवड
२०	आचोळे-०६	३४/४८	३५७९१	शितलाप्रसाद सिंह व मंतोरादेवी सिंह	प्रशांत किशोर घाडी व स्मिता किशोर घाडी

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती 'डी', आचोळे

वसई विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com